**<u>ठळक बातम्या</u>**

- पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानदरम्यानच्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांची संरक्षण सचिवांबरोबर चर्चा

- वक्फ सुधारणा कायदा २०२५ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

- जनुकीय तंत्रज्ञानाने तांदळाचे वाण विकसित करणारा पहिला देश ठरला भारत

**आणि**

- महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या १२वीच्या परीक्षेचे निकाल जाहीर

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत संरक्षण सचिव राजेश कुमार यांच्याशी महत्त्वपूर्ण चर्चा करत आहेत. प्रधानमंत्र्यांची काल नवी दिल्लीत हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल एपी सिंग यांच्याशी चर्चा झाली.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची आज जपानचे संरक्षण मंत्री जनरल नाकातानी यांच्याबरोबर नवी दिल्ली इथे द्विपक्षीय बैठक होत आहे. या बैठकीत दोन्ही देशांच्या प्रादेशिक तसंच आंतरराष्ट्रीय सुरक्षा परिस्थितीवर चर्चा होण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने संरक्षण सहकार्यात वाढ करण्याच्या मार्गांवरही चर्चा होणार आहे. या बैठकीपूर्वी जनरल नाकातानी यांनी नवी दिल्लीतल्या शहीद स्मारकावर आदरांजली वाहिली. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात संरक्षण मंत्र्यांच्या आसियान विषयक संवादानंतरची दोन्ही देशांच्या संरक्षण मंत्र्यांमधली ही दुसरी बैठक आहे.

<><><><>

परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी तेलंगणामधल्या सिरपूर कागजनगर इथं ३ हजार ९०० कोटी रुपयांच्या विकासकामांची पायाभरणी केली. तेलंगणातल्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं गडकरी यावेळी म्हणाले. शेतीच्या विकासासाठी महामार्गालगत अमृत सरोवर विकसित करणार असल्याचं गडकरी यांनी सांगितलं.

<><><><>

आशियाई विकास बँकेच्या म्हणजेच एडीबीच्या नियामक मंडळाच्या 58व्या वार्षिक बैठकीला आजपासून इटलीमध्ये सुरुवात होणार आहे. या चार दिवसीय बैठकीत अर्थमंत्री निर्मला सीतारामन भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व करणार आहेत. त्याचबरोबर, एडीबीचे अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीचे अध्यक्ष आणि जपान बँक फॉर इंटरनॅशनल कोऑपरेशनच्या गव्हर्नरांसमवेत बैठका घेतील, तसंच सीतारामन इटली, जपान आणि भूतान च्या अर्थमंत्र्यांशी द्विपक्षीय चर्चादेखील करणार आहेत. त्याचबरोबर मिलानमधल्या भारतीय समुदायाशीही त्या संवाद साधणार आहेत. तसंच बोकोनी विद्यापीठातल्या एका चर्चासत्रालाही सीतारामन उपस्थित राहाणार आहेत.

<><><><>

अमेरिकेत वॉशिंग्टन इथं आजपासून 8 मे पर्यंत आयोजित करण्यात आलेल्या जागतिक बँक भूमी संमेलनामध्ये भारत जमीन सुधारणा चर्चासत्राचं नेतृत्व करणार आहे. पंचायत राज मंत्रालायचे सचिव विवेक भारद्वाज यांच्या नेतृत्वाखाली भारताचं प्रतिनिधी मंडळ यात भाग घेणार असून जमान मालकी हक्क योजनेविषयी सादरीकरण करणार आहे. 'हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर भूमीचं रक्षण आणि स्वामित्व हक्क याबाबत जागृतीकडून कृतीकडे' ही यावर्षीच्या संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. भारतात जमिनीचा मालकी हक्क सुरक्षित करण्यासाठी सरकारनं

ही योजना राबवली. यामध्ये ड्रोन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे ग्रामीण भागातील मालकी हक्काच्या शेतजमीन आणि इतर जमिनीची मोजणी करण्यात आली आणि देशातल्या 1 लाख 60 हजार गावांमध्ये सुमारे 2 कोटी 44 लाखांपेक्षा जास्त मालकीहक्क जमिनीची कार्ड वितरित करण्यात आली आहेत.

<><><><><>

वक्फ सुधारणा कायदा २०२५ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्यासह न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होणार आहे. या संदर्भात यापूर्वी झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयानं काही मुद्द्यांवर चिंता व्यक्त केल्यानंतर केंद्र सरकारनं कायद्यातल्या काही तरतुदींना स्थगिती दिली आहे. नोंदणीकृत आणि अधिसूचित वक्फ मालमत्ता तसंच वापरकर्त्यांकडून वक्फ घोषित झालेल्या जमिनींच्या सद्यस्थितीवर कोणताही परिणाम होणार नाही, अशी ग्वाही केंद्र सरकारनं दिली आहे.

<><><><><>

भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आज नवी दिल्लीत पक्षाच्या सरचिटणीसांबरोबर बैठक घेतली. भाजपा मुख्यालयात झालेल्या या बैठकीत पक्षाचे सरचिटणीस बी एल संतोष, अरुण सिंग, विनोद तावडे, तरुण चुघ आणि इतर उपस्थित होते.

<><><><><>

जनुकीय तंत्रज्ञानानेतांदळाचे वाण विकसित करणारा पहिला देश हा मान भारताने पटकावला आहे. भारतीय कृषी संशोधन परिषदेतर्फे विकसित करण्यात आलेल्या भारतीय जिनोम संवर्धित तांदळाच्या दोन वाणांचं लोकार्पण केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यानी काल नवी दिल्लीत केलं. वाढत्या

लोकसंख्येची अन्नाची गरज भागवण्याच्या दृष्टीनं हे संशोधन महत्त्वाचं आहे असं ते म्हणाले. महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, तेलंगण, कर्नाटक, तमिळनाडू, छत्तीसगड, बिहार, उत्तरप्रदेश, पश्चिमबंगाल आणि मध्यप्रदेशातल्या शेतकऱ्यांसाठी विशेषत्वाने हे वाण तयार करण्यात आले आहेत. देशाच्या दृष्टीनं हा दिवस ऐतिहासिक असून, या भारतीय वाणांमुळे धानाच्या पिकाचं उत्पादन वाढेल आणि उत्पादन खर्चात घट होईल, असं चौहान म्हणाले तसच हे संशोधन करणाऱ्या कृषी शास्त्रज्ञांचं त्यांनी अभिनंदन केलं.

**<><><><><>**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. परीक्षेचा एकूण निकाल ९१ पूर्णांक ८८ शतांश टक्के इतका लागला आहे. मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण या ९ विभागीय मंडळात बोर्डाची परीक्षा घेण्यात आली. कोकण विभागाचा निकाल ९६ पूर्णांक ७४ शतांश टक्के लागला असून हा विभाग पुन्हा एकदा अव्वल स्थानी आला आहे. त्यापाठोपाठ मुंबई विभागाचा निकाल ९२ पूर्णांक ९३ शतांश टक्के लागला आहे, पुणे ९१ पूर्णांक ३२ शतांश टक्के, नागपूर ९० पूर्णांक ५२ शतांश टक्के, छत्रपती संभाजीनगर ९२ पूर्णांक २४ शतांश टक्के, कोल्हापूर ९३ पूर्णांक ६४ शतांश टक्के, अमरावती ९१ पूर्णांक ४३ शतांश टक्के, नाशिक ९१ पूर्णांक ३१ शतांश टक्के, तर लातूर विभागाचा निकाल सर्वात कमी म्हणजे ८९ पूर्णांक ४६ शतांश टक्के इतका लागला आहे. राज्यात ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत बारावीची परीक्षा घेण्यात आली होती. एकूण १४ लाख १७ हजार ९६९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. विद्यार्थ्यांना उद्यापासून महाविद्यालयात गुणपत्रिका मिळणार असल्याची माहिती, मंडळांनं दिली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातली राजकीय कार्यसंस्कृती सक्षम करण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांचं मोठं योगदान असून टेकवारी उपक्रमामुळे राज्यातलं मनुष्यबळ अधिक तंत्रकुशल, गतिमान, पारदर्शक आणि जबाबदार होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. टेक वारी - महाराष्ट्र टेक लर्निंग वीकचं आज त्यांच्या हस्ते उद्घाटन झालं, तेव्हा ते बोलत होते. टेकवारीच्या कार्यक्रमात शासकीय कर्मचाऱ्यांच्या तंत्रकुशलतेवर भर देतानाच, त्यांचा आहार तसंच मानसिक आरोग्य यावरही भर देण्यात आला आहे, असंही पवार यावेळी म्हणाले.

प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी, प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्यासाठी टेक वारी हा प्रशिक्षण आठवडा आजपासून येत्या ९ मे दरम्यान साजरा करण्यात येणार आहे. या 'टेक वारी' मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन, सायबर सुरक्षा इत्यादी तंत्रज्ञानाबाबत सत्रं तसंच तणाव व्यवस्थापन, आरोग्यदायी जीवनशैली, ध्यानधारणा याबाबतच्या कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ९ मे रोजी दुपारी ३ वाजता या कार्यक्रमाचा समारोप होणार आहे.

**<><><><><>**

राज्य दहशतवाद विरोधी पथकानं नक्षली कारवाया करणाऱ्या रायगड जिल्ह्यातल्या एका नक्षली व्यक्तीला पुण्यातून अटक केली आहे. प्रशांत कांबळे असं या नक्षल्याचं नाव असून तो गेली १३ वर्ष भूमिगत होता. कांबळे तंत्रज्ञानात कुशल असल्यानं आपल्या ज्ञानाचा वापर नक्षली कारवायांसाठी करत असे. सुमारे दहा वर्षांपूर्वी केलेल्या एका नक्षली कृत्यासाठी तो हवा होता मात्र त्याला फरार घोषित करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स या संघात आज सामना होणार आहे. हैदराबाद इथं संध्याकाळी साडे सात वाजता खेळाला सुरुवात होईल.

धर्मशाला इथे काल झालेल्या सामन्यात पंजाब किंग्ज संघाने लखनौ सुपर जाएंट्सचा ३७ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या पंजाब किंग्जने २० षटकांत ५ गड्यांच्या मोबदल्यात २३७ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना लखनौ सुपर जाएंट्सचा संघ २० षटकांत ७ बाद १९९ धावा करू शकला. या विजयासह पंजाब किंग्ज संघ गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे.

//<><><><><>//